**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक २७ मे २०२६**

**ठळक बातम्या..**

1. **आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा कोलकाता इथं होणार**
2. **देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली**
3. **संजय गांधी निराधार अनुदान आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना ऑनलाईन हयात प्रमाणपत्र सादर करता येणार**
4. **विदर्भात उष्णतेची लाट कायम; नागपूर इथं सर्वाधिक ४५ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद अलर्ट**

---

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचा मुख्य कार्यक्रम यंदा कोलकाता इथं होणार आहे. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज योगदिनापूर्वी खजुराहो इथं आयोजित कार्यक्रमात ही माहिती दिली. 'निरोगी वयोवृद्धीसाठी योग' ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना असल्याचं त्यांनी सांगितलं. निरोगी आणि आजारमुक्त वृद्धत्वासाठी योगाला दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचं आवाहन जाधव यांनी केलं. यावेळी योग पार्क उपक्रम, 'योग संगम' पोर्टल आणि योग दिवसानिमित्त नव्या टी-शर्ट डिझाइनचंही अनावरण करण्यात आलं.

---

**पंडित नेहरू पुण्यतिथी**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांना आज आदराजंली वाहण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशातून नेहरू यांना आदरांजली वाहिली. नवी दिल्लीत शांतिवन इथं पंडित नेहरूंच्या समाधीस्थळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी तसंच इतर अनेक नेत्यांनी पुष्पांजली अर्पित केली. लोकसभेचे सभापती ओम बिरला यांनी देखील प्रथम पंतप्रधानांना आदरांजली वाहिली.

---

**बकरी ईद**

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी बकरी ईदनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो, असं त्यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. बकरी ईदच्या निमित्तानं महाराष्ट्र प्राणी संवर्धन (सुधारित) १९९५ कायद्याचं काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महापालिकेनं अधिकृत केलेल्या कत्तलखान्यांमध्येच शासनानं परवानगी दिलेल्या जनावरांची कुर्बानी करण्याचे निर्देशही प्रशासनानं दिले आहेत. बकरी ईद निमित्त राज्यात उद्या सार्वत्रिक सुट्टी जाहीर झाली असून मुंबई शेअर बाजार आणि राष्ट्रीय शेअर बाजारही बंद राहतील.

--------------------------------------------

**नीट पेपरफुटी**

नीट पेपरफुटीप्रकरणी सीबीआयनं आज पुणे आणि लातूर इथून आणखी दोघांना अटक केली. डॉ. मनोज शिरूरे आणि तेजस शाह अशी त्यांची नावं आहेत. मनोज शिरूरे यानं तीन विद्यार्थ्यांना रसायनशास्त्राच्या पेपरमधले प्रश्न पुरवले, तर तेजस शाह यानं मनिषा हवालदारकडून भौतिकशास्त्राचा पेपर घेतल्याचा त्याच्यावर संशय आहे. या प्रकरणात सीबीआयनं आतापर्यंत दिल्ली, जयपूर, गुरूग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर इथून १३ जणांना अटक केली आहे. मनोज शिरुरेला आज न्यायालयात हजर करण्यात आलं असून त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्याची मागणी सीबीआयनं केली आहे.

--------------------------------------------

**पुनरीक्षण**

पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत SIR, अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबवू नका, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. SIR चा दुसरा टप्पा ३० जून ते २९ जुलै दरम्यान होणार आहे. याच कालावधीमध्ये आषाढी वारी असून राज्यातले लाखो वारकरी त्यात सहभागी होत असल्यानं या काळात ते गावाबाहेर असतील, त्यामुळे त्यांची नावं वगळली जाण्याची भीती आहे. तसंच जुलै महिन्यात महामुंबई परिसर, कोकण, पुणे, सातारा भागात अतिवृष्टीचा अंदाज हवामान खात्यानं दिला आहे. या सर्वांचा विचार करून SIR कार्यक्रम महिनाभर पुढं ढकलावा, असं सपकाळ यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना लिहिलेल्या पत्रात केली आहे.

--------------------------------------------

**खत विक्री**

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखडा प्रकल्पांतर्गत IFMS आणि AgriStack प्रणालीचं एकत्रीकरण करण्यात येत असून, खत विक्री प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, सुलभता

आणि  शेतकरी हित साध्य करण्याच्या दृष्टीनं महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आलं आहे. केंद्र शासनामार्फत **'Fertilizer Sale Application System (FSAS)'** हे मोबाईल आधारित ॲप विकसित करण्यात आलं आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना QR कोडद्वारे खतांचं ऑनलाईन बुकिंग करता येणार आहे. शेतकऱ्यांनी केलेलं QR कोड आधारित बुकिंग तीन दिवसांसाठी वैध राहणार असून, संबंधित शेतकरी त्यांच्या सोयीनुसार निवडलेल्या खत विक्रेत्याकडं जाऊन खत खरेदी करू शकतील, अशी माहिती कृषी संचालक सुनील बोरकर यांनी एका पत्राद्वारे दिली आहे.

---------------------------------------------

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत वक्तव्य करताना वापरलेली भाषा सहन केली जाणार नाही आणि  अशा प्रकारची भाषा वापरल्यास भाजप कार्यकर्ते त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाहीत, असा इशारा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.  बावनकुळे यांनी नागपूर विमानतळावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. अशा वक्तव्यांमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये तीव्र आक्रोश निर्माण होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला.

---------------------------------------------

**डिजिटल कृषी शाळा**

कृषि आयुक्त कार्यालय, पाणी  फाऊंडेशन, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोक्रा), 'उमेद' अभियान आणि राज्यातील प्रमुख कृषी विद्यापीठं यांच्या संयुक्त विद्यमानं शेतकऱ्यांसाठी गेल्या २५ मे पासून 'डिजिटल शेतीशाळा २०२६'चं आयोजन करण्यात आलं आहे. या डिजिटल शेतीशाळेच्या माध्यमातून खरीप हंगामातील विविध पिकांचं आधुनिक तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यात येणार असून, जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा लाभ घ्यावा, असं आवाहन करण्यात आलं आहे. या शेतीशाळेमध्ये दररोज वेगवेगळ्या पिकांनुसार तज्ञ शास्त्रज्ञ आणि कृषी अधिकारी शेतकऱ्यांना थेट मार्गदर्शन करणार आहेत. शेतकऱ्यांच्या मनात असणाऱ्या तांत्रिक शंकांचं निरसन झूमच्या चॅट बॉक्समध्ये किंवा युट्युबच्या कमेंट सेक्शनमध्ये टाईप करून करता येणार आहे.

---------------------------------------------

**हयात प्रमाणपत्र**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि  श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील

लाभार्थ्यांना आता लाभार्थी सत्यापन ॲप अर्थात  Beneficiary Satyapan App च्या माध्यमातून ऑनलाईन हयात प्रमाणपत्र सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.या सुविधेमुळे वृद्ध, विधवा, निराधार व्यक्ती तसंच दिव्यांग लाभार्थ्यांना तहसील कार्यालय, बँक अथवा पोस्ट आफिस इथं वारंवार जाण्याची आवश्यकता राहणार नाही.  पात्र लाभार्थ्यांना स्वत: अथवा इतर नातेवाईकांच्या मदतीनं अथवा गावपातळीवरील ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत, संगणक परिचारक, कर्मचारी यांच्या माध्यमातूनही ही प्रक्रिया पूर्ण करता येईल. याचबरोबर सेतु सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र तसंच नागरी सेवा केंद्र यांच्या माध्यमातून देखील लाभार्थ्यांना या ॲपद्वारे ऑनलाईन पद्धतीनं हयात प्रमाणपत्र सादर करता येईल. ही सेवा लाभार्थ्यांसाठी विनामूल्य उपलब्ध राहणार आहे. लाभार्थ्यांनी सेतु सेवा केंद्र, नागरी सेवा केंद्र यांच्या माध्यमातून सेवा घेतल्यास त्यासाठी किमान ५० रुपये इतकं सेवा शुल्क द्यावं लागेल.

--------------------------------------------

**कोल इंडिया लिमिटेड**

केंद्र सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील खाण कंपनी कोल इंडिया लिमिटेड (सीआयएल) मधील आपला दोन टक्के हिस्सा विकण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. ही प्रक्रिया बिगर-खुदरा गुंतवणूकदारांसाठी विक्री प्रस्ताव (ओएफएस) अंतर्गत बुधवारी खुली करण्यात आली. यासाठी प्रति शेअर किमान 412 रुपये किंमत निश्चित करण्यात आली आहे. या विक्रीतून सरकारला सुमारे 5,000 कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा आहे.

--------------------------------------------

**दिव्यांग लाभार्थी**

दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या शासन निर्णयानुसार विशेष सहाय्य योजनेतील ज्या दिव्यांग लाभार्थ्यांकडं वैश्विक ओळखपत्र  अर्थात UDID Card उपलब्ध नाही, अशा लाभार्थ्यांनी दिनांक 15 जूनपर्यंत अर्ज करावेत. हे अर्ज स्वावलंबन पोर्टलद्वारे ऑनलाईन करून त्यांची प्रत संबंधित तहसील कार्यालयाकडं सादर करणं आवश्यक आहे. विशेष सहाय्य योजनेचा लाभ अखंडितपणे मिळण्यासाठी विहित मुदतीत अर्ज प्रक्रिया पूर्ण करणं आवश्यक आहे.

--------------------------------------------

**हवामान- मोदी आवाहन**

विदर्भात उष्णतेची लाट कायम असून आज दुपारी अडीच वाजता नागपूर इथं सर्वाधिक ४५ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. त्या खालोखाल चंद्रपूर आणि वर्धा जिल्ह्यात ४४ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आलं.

अमरावती आणि गडचिरोली इथं ४४ पूर्णांक २, गोंदिया ४३ पूर्णांक ६, गोंदियात ४३ पूर्णांक ४, अकोला ४३ पूर्णांक ३, अमरावती इथं ४३ पूर्णांक २, तर बुलढाण्यात ३९.६ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. पुढील २४ तासांसाठी नागपूर, वर्धा, चंद्रपूर, वाशीम, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यासाठी उष्णतेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या काळात विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची देखील शक्यता आहे. दरम्यान, देशाच्या विविध भागांमध्ये वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना शक्य तितकी खबरदारी घेण्याचं आवाहन केलं आहे. उष्णतेमुळे दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या अडचणींमध्ये सध्या वाढ झाली असून त्यासाठी शक्य ती सर्व काळजी घ्यावी, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. उष्णतेचा आघात टाळण्यासाठी भरपूर पाणी प्यावं, दुपारच्या कडक उन्हात शक्यतो बाहेर जाणं टाळावं आणि विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असून प्राणी-पक्ष्यांसाठी घराबाहेर, गच्चीवर, दुकानं तसंच कार्यालयांच्या बाहेर पाण्यानं भरलेलं भांडं ठेवण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे. या कठीण दिवसांमध्ये सर्वांनी संवेदनशीलता दाखवावी, असंही मोदी म्हणाले.

---

**बॅडमिंटन**

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत भारताच्या एच एस प्रणोयनं इंडोनेशियाच्या जोनाथन ख्रिस्तीवर 10-21, 21-12, 21-18 अशी चुरशीच्या तीन गेम्समध्ये मात करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. जागतिक क्रमवारीत प्रणोय ३५, तर ख्रिस्ती ५ व्या स्थानावर आहेत. पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत आज के. श्रीकांत आणि लक्ष्य सेन यांचेही सामने होणार आहेत, तर महिला एकेरीत मालविका बनसोडला तैवानच्या सियांग टीमकडून 21-,11 19-21, 12- 21 असा पराभव पत्करावा लागला.

---

**पीक रोग नियंत्रक**

राज्यामध्ये प्राण्यांमधील लाळ खुरकत रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लसीकरण फेरी-9 ची पूर्वतयारी वेगानं सुरू झाली आहे.या फेरीसाठी राज्याला मे महिना अखेरीस तब्बल 119 लक्ष 1 कोटी 19 लाख लस मात्रा प्राप्त होणार आहेत. ऐन वेळी लसींचा साठा सुरक्षित ठेवण्यासाठी, तसंच वितरणात कोणताही अडथळा येऊ नये, यासाठी पशुसंवर्धन विभागानं नियोजन करण्यास सुरुवात केली आहे.

---